वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्यात वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत...
श्रीमती के.एल.तिवारी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नालासोपारा(पश्चिम), ता.वसई, जि.पालघर

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र. ३५५ /तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०३ सप्टेंबर, २०१६.

**वाचा :-** १) वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. CA/५/Academic-MH९४, दिनांक २०.०६.२०१६
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीपी/मान्यता/२०१६/८६०, दिनांक ३०.०६.२०१६.

**प्रस्तावना :**

उपरोक्त वाचा १) येथील पत्रान्वये वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून श्रीमती के.एल.तिवारी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सर्वे नं.१८५,१७७, श्रीप्रस्थ, नालासोपारा विहार लिंक रोड, नालसोपारा(पश्चिम), ता.वसई,जि.पालघर ही वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन उपरोक्त वाचा २) येथील पत्रान्वये संचालक, तंत्र शिक्षण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून ४० प्रवेशक्षमतेसह शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त वाचा १) येथील पत्रान्वये वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून श्रीमती के.एल.तिवारी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,सर्वे नं.१८५,१७७, श्रीप्रस्थ, नालासोपारा विहार लिंक रोड, नालसोपारा (पश्चिम), ता.वसई,जि.पालघर ही वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था ४० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. प्रस्तुत बाबतीत वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमूद केल्याप्रमाणे राहील.

३. शासनाने विहित केलेल्या तसेच वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे .तसेच विद्यार्थ्यांना वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९. रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ

रॅगिंग अॅक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०. याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०९०३११४२५४५७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म.मा.मोरवे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२.सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय , मुंबई .
३.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.(संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत)
४.संस्थाप्रमुख, श्रीमती के तिवारी.एल.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सर्वे नं.१८५, १७७, श्रीप्रस्थ, नालासोपारा विहार लिंक रोड, नालसोपारा(पश्चिम), ता.वसई,जि.पालघर
५.प्रबंधक, वास्तुकला परिषद, इंडीया हॅबीटॅट सेंटर, कोअर-६ ए, पहिला मजला, लोधी रोड, नवी दिल्ली ११० ००३.
६.सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
७.निवड नस्ती/तांशि-४